# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी.
## पाणी पुरवठा विभाग

**विषय :- भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका केंद्र शासन पुरस्कृत अमृत २.० योजने अंतर्गत १०० एम.एल.डी. पाणी पुरवठा योजनेच्या निविदेतील प्राप्त दरांच्या प्रशासकिय ठरावास मान्यता मिळणे बाबत.**

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या अमृत २.० योजने अंतर्गत १०० एम.एल.डी. पाणी पुरवठा योजनेच्या कामा करीता ई-निविदा तिसऱ्यांदा प्रसिद्ध केली असता एकुण ३ निविदा प्राप्त झालेल्या आहेत. महाराष्ट्र जीवन प्राधीकरण (PMC), ठाणे यांचे कडुन तांत्रिक निविदा छानणी करुन मिळणे बाबत अभिप्राय मागविण्यांत आला असता मजीप्रा यांनी प्राप्त झालेल्या ३ निविदांपैकी मे. पी. एल. आडके व मे. देव इंटरप्राईजेस यांनी निविदेतील अटी-शर्तींची पुर्तता न केल्यामुळे अपात्र ठरविण्यांत आलेले आहे. मे. वेंसर-विजय कं. (J.V.) यांचा वित्त लिफाफा (FINANCIAL BID) दि.१७/१०/२०२३ रोजी उघडण्यांत आले असता निविदेतील प्राप्त दर हे अंदाजपत्रकिय दरांपेक्षा १६.४७% जास्त दराने प्राप्त झालेले आहेत. त्यानुसार दि.१९/१०/२०२३ रोजी संबंधीत ठेकेदार यांना वाटाघाटी करीता बोलाविले असता त्यांनी ०.५०% कमी करुन १५.९७% मात्र जास्त दराने करणे बाबत पत्र दिले. मा. आयुक्त सो. यांचे दालनात झालेल्या वाटाघाटी नंतर पुन्हा दि.२७/१०/२०२३ रोजी संबंधीत ठेकेदार यांनी सदरचे काम अंदाजपत्रकीय दरांपेक्षा १२.९०% जास्त दराने करणे तयार असल्याचे कळविले असुन सोबत दरांबाबत विस्तृत खुलासा सादर केलेला आहे. सदरील खुलास्यामध्ये M.S. Pipe, Lead Charges बाबतीत बाजार भावाप्रमाणे सादर केलेले जास्तीचे दर कसे योग्य आहेत याबाबत स्पष्टीकरण दिलेले आहे. याबाबत निविदा समितीने उहापोह चर्चा करुन निविदेचे जास्तीचे दर योग्य असले बाबत मत नोंदविले आहे.

निविदाकार मे. वेन्सर-विजय कन्स्ट्रक्शन कं. (J.V.) यांच्या अंदाजपत्रकीय दरांपेक्षा १२.९०% जास्त दराच्या निविदेबाबत कामाची निकड लक्षात घेता काल अपव्यय होऊ नये म्हणून राज्यस्तरीय तांत्रिक समितीचा (SLTC) निर्णय होणे कामी मा. प्रधान सचिव सो. (नवि-२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ यांना पत्रान्वये कळविण्यांत आले आहे. त्यानुसार सदर प्रकल्पाची निविदा प्रक्रिया तीन वेळेस पार पडली व त्यास मिळणारा अत्यल्प प्रतिसाद विचारात घेता प्रस्तावित केल्यानुसार पात्र कंत्राटदारास कार्यादेश देण्याच्या अनुषंगाने व प्रकल्प विहित मुदतीत पुर्ण करण्याच्या दृष्टीने विहित कार्यपद्धतीनुसार आवश्यकती कार्यवाही करणे कामी मा. कक्ष अधिकारी सो. महाराष्ट्र शासन यांचे कडुन कळविण्यांत आलेले आहे.

भिवंडी शहराची भौगोलिक परिस्थिती पहाता कामात येणाऱ्या अडचणी, वाहतुक समस्या व उपरोक्त कामाची निकड लक्षात घेता सदर कामाकरीता निवदेतील अंदाजपत्रकीय दरांपेक्षा १२.९०% जास्त रक्कम रु.४२,४४,०३,०३२/- व जी.एस.टी. रु.७,६३,९२,५४६/- मात्र असे एकुण रु.५०,०७,९५,५७८/- मात्रचा खर्च मनपा निधीमधून करावा लागणार आहे व त्याबाबत लेखा विभागाकडुन पुढील आर्थिक वर्षामध्ये तरतुद करण्याची आवश्यकता आहे.

तरी उपरोक्त कामाची मे. वेन्सर-विजय कन्स्ट्रक्शन कं. (J.V.) यांची अंदाजपत्रकीय दरांपेक्षा १२.९०% जास्त दरांची रक्कम रु.३७१,४३,४९,०१९/- मात्रच्या निविदा प्राप्त झालेली आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | प्राप्त निविदा दर |
|---|---|---|
| १ | **भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका केंद्र शासन पुरस्कृत अमृत २.० योजने अंतर्गत १०० एम.एल.डी. पाणी पुरवठा योजनेच्या निविदेतील प्राप्त दरांच्या प्रशासकिय ठरावास मान्यता मिळणे बाबत.** | **रु.३७१,४३,४९,०१९/-** |

सद्य कालावधीत मा. महासभा व मा. स्थायी समिती संपुष्टात आलेली आहे. शासन आदेश क्र. एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१(भाग-२)नवि-१४, दि.०६ जुन २०२२ रोजी नुसार मा. महासभा व मा. स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेसाठी प्रशासक नियुक्त करण्यांत आलेले आहेत. त्यामुळे भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेचा कार्यभार हे प्रशासक पहात आहेत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५२ अ च्या (१अ) व (१ब) मधील तरतुदीनुसार निविदा विषयक संविदा करण्याचे अधिकार मा. प्रशासक यांना आहेत.

उपरोक्त नमुद भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका केंद्र शासन पुरस्कृत अमृत २.० योजने अंतर्गत १०० एम.एल.डी. पाणी पुरवठा योजनेच्या निविदेतील प्राप्त दरांच्या प्रशासकिय ठरावास मान्यता मिळणे कामी व पुढील कार्यवाही करणे कामी मंजुरी देणे बाबतचा प्रस्ताव.

**प्रशासकिय ठराव क्रमांक :** २८८ **दिनांक :** ०९/११/ **२०२३**

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका केंद्र शासन पुरस्कृत अमृत २.० योजने अंतर्गत १०० एम.एल.डी. पाणी पुरवठा योजनेच्या निविदेतील प्राप्त रु.३७१,४३,४९,०१९/- मात्र दरांच्या निविदा व या संदर्भात राज्यस्तरीय तांत्रिक समिती (SLTC) यांचे प्राप्त इतिवृत्तानुसार मा. प्रशासक तथा आयुक्त यांनी मान्यता दिलेली आहे. सदर निविदेस प्रशासकिय ठरावाद्वारे मान्यते बाबतचा प्रस्ताव कार्यकारी अभियंता, मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा व वित्त अधिकारी व अति. आयुक्त यांचे अभिप्राय विचारात घेता महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्र. एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१(भाग-२)नवि-१४, दि.०६ जुन २०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१अ) व (१ब) मधील तरतुदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी, अजय वैद्य, प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका केंद्र शासन पुरस्कृत अमृत २.० योजने अंतर्गत १०० एम.एल.डी. पाणी पुरवठा योजना निविदेच्या वाटाघाटीअंती, अंदाजपत्रकीय दरांपेक्षा १२.९०% जास्त दरांच्या प्राप्त निविदेस म्हणजेच रु.३७१,४३,४९,०१९/- मात्रच्या किंमतीस व वाढीव रक्कम रु.४२,४४,०३,०३२/- मात्र व जी.एस.टी. रु.७,६३,९२,५४६/- मात्र असे एकुण रु.५०,०७,९५,५७८/- मात्रच्या खर्चास लेखा विभागाकडुन पुढील आर्थिक वर्षाकरीता तरतुद करणेसह या प्रशासकिय ठरावाद्वारे स्थायी समिती व महासभेचे प्रशासक म्हणुन प्राप्त अधिकाराद्वारे मान्यता देण्यांत येत आहे व या आधारे कार्यादेश निर्गमित करणे बाबत विभागाने कार्यवाही करावी.

**(अजय वैद्य)**
**प्रशासक तथा आयुक्त**
**भिवंडी नि.शहर महानगरपालिका,भिवंडी.**